महाराष्ट्र शासन

# विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर

ड विभाग, तळ मजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर 413001

दूरध्वनी क्र. 0217-2324055 E-mail - jtdirhesol@rediffmail.com

जा.क्र. विससं/उशि/सोविसो/2024/ दि. 23/07/2024

प्रति,

1. कुलसचिव,
   पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विदयापीठ, सोलापूर
2. प्राचार्य,
   सर्व अशासकीय अनुदानित,विना अनुदानित व कायम विना अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविदयालये, सोलापूर विभाग.

विषय : उच्च शिक्षण घेणा-या मुलींना मोफत शिक्षण योजनेच्या अंमलबजावणीबाबत

संदर्भ : 1. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.शिष्यवृ-2024/प्र.क्र.105/तांशि-4, दि.8.7.2024

2. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा., पुणे यांचे परिपत्रक क्र.उशिसं/शिष्य-2024-25/मुमोशि/3852, दि.19 जुलै 2024

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र. 2 च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचनांनुसार खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अ) महाविदयालय/संस्थास्तरावर शिष्यवृत्ती जाणकार असलेल्या अध्यापकांची स्कॉलरशिप नोडल अधिकारी यांची नेमणूक करण्यात यावी. नोडल अधिका-याचे नाव व मोबाईल नंबर या कार्यालयास त्वरित कळविण्यात यावा.

ब) महाविदयालयामध्ये स्वतंत्र शिष्यवृत्ती कक्ष निर्माण करुन त्यामार्फत विदयार्थ्यांना मुलींना मोफत शिक्षण या योजनेची माहिती तसेच त्याकरीता आवश्यक कागदपत्रांची पूर्वतयारी करणेबाबत माहिती देण्यात यावी

क) मुलींना मोफत शिक्षण या योजनेची सविस्तर माहिती असलेला फलक महाविदयालयाच्या दर्शनी भागात विदयार्थ्यांच्या दृष्टीक्षेपात ठळकपणे येईल अशा स्वरुपात लावण्यात यावा.

क) मुलींना मोफत शिक्षण या योजनेची माहिती महाविदयालयाच्या संकेतस्थळावर ठळकपणे प्रसिध्द करावी.

मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या अंमलबजावणीबाबत आपण मुलींना येणा-या अडचणी, शंका यांचे निराकरण करण्यात यावे. याबाबत आपण व्यक्तिश: लक्ष देऊन कोणतीही पात्र विदयार्थीनी या योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

Signed by
Nalini Khemraj Tembhekar
Date: 23-07-2024 15:42:24

विभागीय सहसंचालक, (उ.शि.)
सोलापूर विभाग, सोलापूर.

विभागीय सहसंचालक (उ.शि.)
सोलापूर विभाग सोलापूर
कार्यासन- आ.क्र.
क.प्र.अ. प्र.अ.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत पुणे ४११ ००१
web: www.dhepune.gov.in Mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.020/26126939/2970798

क्र.उशिसं/शिष्य-2024-25/मुमोशि/ 3८५२ दि. 19.07.2024

अत्यंत महत्वाचे

19 JUL 2024

परिपत्रक

**विषय :- उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजनेच्या अमंलबजावणीबाबत**

संदर्भ :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शिष्यवृ.-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८.०७.२०२४.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, शासन निर्णय दि. ७.१०.२०१७ नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्र निकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुला-मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येतो.

तसेच संदर्भाधिन शासन निर्णयान्वये, व्यावसायिक अभ्यासक्रमास शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process – CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील नविन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेश असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना उच्च व तंत्र शिक्षण विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागाकडून वर्ष २०२४-२५ पासून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण या योजनेची अंमलबजावणी करणेकरीता विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) यांना पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. योजनेची संबंधित विभागामध्ये प्रभावी अंमलबजावणी करणे करीता आपल्या कार्यकक्षेत येणाऱ्या जिल्ह्यामधील मा. जिल्हाधिकारी यांचेशी समन्वय साधून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सदरहू जिल्ह्यामधील शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व्यावसायिक व बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालया मधील प्राचार्यांची कार्यशाळा आयोजित करावी. **सदरची कार्यवाही पुढील दहा दिवसांमध्ये पूर्ण करावी.**

२. तसेच विभागामधील अकृषी विद्यापीठामधील मा. कुलगुरु, कुलसचिव यांच्यासोबत महाविद्यालयातील प्राचार्य यांचेकरीता कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात.

३. मुलींना मोफत शिक्षण या योजनेची व कार्यशाळांबाबतची माहिती स्थानिक वर्तमानपत्रामध्ये तात्काळ प्रसिध्द करावी.

४. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण या कार्यालयामध्ये कनिष्ठ प्रशासन अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची विभागस्तर स्कॉलरशिप नोडल ऑफिसर (Scholarship Nodal Officer) यांची नेमणूक करावी तसेच अधिनस्त असलेल्या प्रत्येक जिल्ह्याकरीता एक याप्रमाणे शिष्यवृत्ती कामकाजाकरीता जिल्हा नोडल ऑफिसर (District Nodal Officer) यांची नेमणूक करावी. तसेच संबंधित नोडल अधिकारी यांचा संपर्क क्रमांक प्रसिध्द करावा.

५. विभागाच्या कार्यकक्षेमधील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये / संस्था यांचे प्राचार्य / संचालक यांना पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात यावे.

अ) महाविद्यालय / संस्था स्तरावर शिष्यवृत्ती जाणकार असलेल्या अध्यापकाची स्कॉलरशिप नोडल ऑफिसर यांची नेमणूक करण्यात यावी.

ब) महाविद्यालयामध्ये स्वतंत्र शिष्यवृत्ती कक्ष निर्माण करुन त्यामार्फत विद्यार्थ्यांना मुलींना मोफत शिक्षण या योजनेची माहिती तसेच त्याकरीता आवश्यक कागदपत्रांची पूर्वतयारी करणेबाबत माहिती देण्यात यावी.

क) मुलींना मोफत शिक्षण या योजनेची सवितस्तर माहिती असलेला फलक महाविद्यालयाच्या दर्शनी भागात विद्यार्थ्यांच्या दृष्टीक्षेपात ठळकपणे येईल अशा स्वरुपात लावण्यात यावा.

ड) मुलींना मोफत शिक्षण या योजनेची माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर ठळकपणे प्रसिध्द करावी.

वर नमुद केल्यानुसार मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या अंमलबजावणीबाबत अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांचा वेळोवेळी आढावा बैठका आयोजित करुन त्यांना सदरहू योजनेच्या अंमलबजावणीबाबत येणाऱ्या अडचणी, शंका यांचे निराकरण करण्यात यावे. याबाबत संबधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी व्यक्तीश: लक्ष देऊन कोणतीही पात्र विद्यार्थीनी या योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १६

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग.

प्रत :- कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

प्रत :- मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.